Journal of the Oriental Institute
M. S. University of Baroda
ISSN No. 0030-5324
Impact Factor 7.1
UGC Care Group I

# जळगाव जिल्ह्यातील महिलांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदान
## (श्रीमती प्रतिभाताई पाटील व सौ. लिलाताई पाटील)

**सुनीताबाई भगवान पाटील,** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, एस. पी. डी. एम. आर्ट्स, एस. बी. बी. आणि एस. एच. डी. कॉमर्स आणि एस. एम. ए. सायन्स कॉलेज ता. शिरपूर जि. धुळे
**प्रा. डॉ. मनीषा जगदीशलाल वर्मा,** संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, एस. पी. डी. एम. आर्ट्स, एस. बी. बी. आणि एस. एच. डी. कॉमर्स आणि एस. एम. ए. सायन्स कॉलेज ता. शिरपूर जि. धुळे

**प्रस्तावना:**

जळगाव जिल्हा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीयदृष्ट्या संपन्न वारसा लाभलेला एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. या जिल्ह्यातील महिलांनी शिक्षण, सामाजिक सुधारणा, महिला सक्षमीकरण, तसेच राजकीय नेतृत्वाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गावपातळीपासून ते जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि विधानसभा पातळीपर्यंत महिलांनी आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवला आहे. सामाजिक संस्थांमधून जनजागृतीचे कार्य करत असताना त्यांनी स्त्रीशक्तीचा प्रत्यक्ष प्रत्यय दिला आहे. हे योगदान समजून घेणे म्हणजे जळगाव जिल्ह्याच्या प्रगतीच्या मोलाच्या घटकांचे मूल्यांकन करणे होय.

**विषय प्रवेश:**

भारतीय समाजव्यवस्थेत महिलांनी ऐतिहासिक काळापासूनच विविध क्षेत्रांत आपले योगदान दिले आहे. सामाजिक क्षेत्रात त्यांनी शिक्षण, आरोग्य, महिला हक्क, स्वच्छता, बालकल्याण यांसारख्या मुद्द्यांवर काम करून समाजप्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य केले. अनेक स्वयंसेवी संस्था, महिला मंडळे, आणि बचतगट यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण व शहरी भागात जनजागृती घडवून आणली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. 73व्या आणि 74व्या घटनादुरुस्तीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्याने त्यांनी नेतृत्वक्षमता सिद्ध केली आहे. सरपंच, नगरसेविका, आमदार अशा भूमिकांमधून त्यांनी प्रशासनात पारदर्शकता आणि सामाजिक संवेदनशीलता आणली. महिला नेतृत्वामुळे विकासकामांमध्ये महिलांच्या गरजांना प्राधान्य मिळाले असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत झाली आहे. हे योगदान समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यंत मोलाचे आहे.

1947 नंतर महाराष्ट्रात अनेक सामाजिक आंदोलनं उभी राहिली, आणि त्यामध्ये जळगाव जिल्ह्यातील महिलांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. मात्र, खेदाची बाब म्हणजे या महिलांचे योगदान इतिहासात पुरेसं नोंदवलं गेलं नाही. कदाचित हे आपल्या देशातील सामाजिक संरचनेचे दुष्परिणाम असावेत. जिल्ह्यातील महिलांनी सुधारकी, प्रगत आणि पुरोगामी विचारांना नेहमीच सक्रिय पाठिंबा दिला. त्यांनी केवळ विचारांच्या पातळीवरच नव्हे, तर कृतीतूनही सामाजिक बदलाची दिशा दाखवली. यामुळेच त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यासाठी समर्पित केलं. हे स्पष्टपणे दर्शवतं की, जळगाव जिल्ह्यातील महिला सामाजिक क्षेत्रात अत्यंत सक्रिय आणि प्रभावी भूमिका बजावत होत्या.

**लिलाताई पाटील यांचे सामाजिक व राजकीय कार्य:**

सौ. लिलाताई पाटील यांचे मूळ गाव साकोरे, ता. नांदगाव, जि. नाशिक असून विवाहानंतर त्या जळगाव येथे स्थायिक झाल्या. त्यांचे वडील वामनराव पाटील हे सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते आणि

तत्कालीन नाशिक जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यामुळे लहानपणापासूनच लिलाताईंच्या मनात सामाजिक कार्याची प्रेरणा ठसली.

अत्यंत श्रीमंत जमिनदार घरातील लिलाताईंनी, कफल्लक पण सत्यशोधकी विचारसरणीचा वारस असलेल्या डॉ. उत्तमराव गिरधर पाटील यांच्याशी विवाह करून समाजाच्या पारंपरिक बंधनांना आव्हान दिले. न मागणी, न लग्नसोहळा, न वऱ्हाड – अत्यंत साध्या पद्धतीने, अस्पृश्य समाजातील कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या हस्ते, सत्यशोधक पद्धतीने हा विवाह पार पडला. या विवाहाने संपूर्ण खानदेशात खळबळ उडवली. लिलाताईंच्या या निर्णयाचा समाजात विरोध झाला, गावाने बहिष्कार टाकला, विहिरीचे पाणीही बंद केले गेले, पण त्या डगमगल्या नाहीत.[1]

लिलाताई पाटील व उत्तमराव पाटील यांनी सर्व अनिष्ट प्रथांना झुगारून नव्या समाजाची पायाभरणी केली. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी लिलाताईंनी मेलेल्या मुलाच्या मढ्यावरील कापडाचा ब्लाउज घालून समाजाला धक्का दिला. त्यांचा हा क्रांतिकारी निर्णय समाजप्रबोधनाचा भाग होता. त्यांनी मंगळसूत्र, जोडवे, पदर, सौभाग्यचिन्हे यांना साफ नकार दिला आणि मराठा समाजातील स्त्रियांना नव्या विचारांची दिशा दिली.

उत्तमराव पाटील वैद्यकीय शिक्षण घेत असताना, त्यांनी लिलाताईंना अहमदनगर येथे प्राथमिक नर्सिंग कोर्ससाठी पाठवले. शिक्षण पूर्ण केल्यावर लिलाताईंनी स्वतःचा दवाखाना सुरू करून रुग्णसेवा केली. अमळनेर येथे दवाखाना चालवून त्यांनी गरिबांच्या आरोग्याची काळजी घेतली. महात्मा फुले यांनी जसे सावित्रीबाईला शिक्षिका बनवले, तसेच उत्तमरावांनी लिलाताईंना सामाजिक कार्यकर्त्या म्हणून घडवले. लिलाताईंनी सासरची गरीबी, बहिष्कार, दारिद्र्य यांना सामोरे जात संपूर्ण आयुष्य समाजासाठी वाहिले. त्यांनी मार्शल कंपनीचा भंग करीत खानदेशातील आंदोलने सुरू ठेवली. त्यांच्या कार्यामुळे खानदेश हे क्रांतीचे केंद्र बनले.

लिलाताईंनी केवळ स्त्रियांचे नव्हे तर संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. त्यांनी बोर्डिंग चालवले, आरोग्य, स्वच्छता, जातीनिर्मूलन, हुंडाबंदी अशा अनेक चळवळी चालवल्या. त्यांना धुळे, ठाणे व येरवडा कारागृहात शिक्षा भोगावी लागली तरी त्यांनी आंदोलन सोडले नाही. स्त्रियांचे सैनिकी प्रशिक्षण, स्त्री-पुरुष समानता, मजुरीतील भेदभाव नष्ट करणे, यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.[2] स्त्रीचे सांस्कृतिक आणि सामाजिक स्वातंत्र्य हेच त्यांच्या कार्याचे केंद्रबिंदू होते.

सौ. लिलाताई पाटील यांचे राजकीय कार्य हे त्यांच्या सामाजिक कार्याच्या समांतरच, समाजपरिवर्तनाच्या दृढ इच्छाशक्तीतून घडलेले आहे. त्यांचे राजकारण हे सत्तेच्या प्रतिष्ठेसाठी नव्हते, तर शोषित, वंचित, महिलांच्या न्यायहक्कासाठी झगडण्याचे एक माध्यम होते.

लिलाताईंच्या राजकारणावर महात्मा फुले, डॉ. आंबेडकर व गांधींच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी राजकारणात प्रवेश केल्यावरही समाजसेवा हीच प्राथमिकता होती. लिलाताईंनी पंचायत राज प्रणालीतून कार्य सुरू केले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्न केले. महिलांनी निवडणूक लढवावी, सार्वजनिक कामात सहभागी व्हावे यासाठी त्या सतत प्रोत्साहन देत. त्यांनी अनेक सामाजिक आंदोलनांमध्ये नेतृत्व केले.[3] हुंडा बंदी, जातीय विषमता, महिला अत्याचार विरोध, मजूर हक्क, स्त्री शिक्षण यांसाठी त्यांनी मोर्चे व उपोषणे केली. जरी त्यांना अनेक राजकीय पक्षांतून उमेदवारी देण्याचे प्रस्ताव आले, तरी त्यांनी तत्त्वांशी तडजोड न करता निवडकच भूमिका घेतली.

त्यांनी स्वतःसाठी कधीही सत्ता किंवा पद मागितले नाही, पण इतर महिलांना पुढे आणण्यासाठी त्या झटत राहिल्या. डॉ. उत्तमराव पाटील हे स्वयंभू समाजवादी नेते होते. त्यांच्या मार्गदर्शनात लिलाताईंनीही समाजवादी विचारसरणीचा अंगीकार केला. दोघेही सामाजिक आणि राजकीय कार्य एकत्रितपणे करत असत. काही आंदोलनांमध्ये सहभागी असल्यामुळे त्यांना ठाणे, धुळे, येरवडा येथे कारावास देखील भोगावा लागला, जो त्यांच्यासाठी सन्मानास्पद अनुभव होता. लिलाताई पाटील यांचे राजकारण हे केवळ निवडणूक, मतं किंवा पदे यापुरते मर्यादित नव्हते. त्यांचे कार्य हे 'राजकारण समाजकारणासाठी' या तत्वावर आधारित होते.[4] त्यांनी वंचितांचे राजकारण, स्त्रियांचे नेतृत्व आणि मूल्याधारित भूमिका यांचे उदाहरण समाजापुढे ठेवले.

**श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे सामाजिक व राजकीय कार्य:**

श्रीमती प्रतिभाताई देवीसिंह पाटील यांचा जन्म 19 डिसेंबर 1934 रोजी जळगाव जिल्ह्यात झाला. त्यांच्या आईचे नाव गंगाबाई आणि वडिलांचे नाव नानासाहेब पाटील होते, जे सरकारी वकील होते. त्यांच्या कुटुंबात पाच मुले आणि एक मुलगी होती. प्रतिभाताईंचे बालपण जळगाव व चाळीसगाव येथे गेले. सुट्टीच्या काळात त्या आपल्या आजोळी नांदगावला जात असत. वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांच्या आईचे निधन झाले आणि त्यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या मावशी – बासाहेब – यांनी केले. त्यांनी प्रतिभाताईंवर चांगले संस्कार केले, परंपरांचे पालन शिकवले, आणि त्यांच्या विचारांना आकार दिला. त्यामुळे प्रतिभाताईंत कणखर इच्छाशक्ती, नात्यांतील आपुलकी आणि व्यवहारातील शिस्त निर्माण झाली.

नानासाहेब पाटील यांनी आपल्या पत्नीला मुलीला चांगले शिक्षण देण्याचे वचन दिले होते आणि ते त्यांनी पूर्णतः पाळले. प्रतिभाताईंनी एम.जे. कॉलेजमधून राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विषयात एम.ए. पदवी प्राप्त केली आणि पुढे मुंबई विद्यापीठातून एल.एल.बी. करून वकील ही झाल्या. त्यांनी सामाजिक क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेतला. 1965 मध्ये त्यांचा विवाह डॉ. देवीसिंह शेखावत यांच्याशी झाला.

प्रतिभाताई पाटील यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला आणि जळगाव जिल्ह्याच्या सामाजिक विकासात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना सामाजिक कामांकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळाली. सामान्य पार्श्वभूमीच्या महिलांना सामाजिक कार्यात संधी मिळत नसल्याचे वास्तव त्यांनी अधोरेखित केले. त्यामुळे सर्वसामान्य महिलांच्या सहभागामुळेच खऱ्या अर्थाने सबलीकरण व सक्षम नेतृत्व निर्माण होईल, हे त्यांनी दाखवून दिले. 2010 साली 'National Mission for Empowerment of Women (NMEW)' च्या माध्यमातून त्यांनी महिला व बालकल्याण मंत्रालयाशी सहकार्य करून अनेक उपयुक्त योजना राबवल्या. त्यांच्या मते, जर महिलांचे सबलीकरण झाले, तर देशाच्या प्रगतीला बळ मिळेल.[5]

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी राष्ट्रीय ज्ञानसाधना केंद्राची स्थापना केली. बालविकास मंत्रालयाच्या अंतर्गत स्थापन झालेल्या या केंद्रामध्ये 12 तज्ज्ञ महिला सहभागी करण्यात आल्या. महिलांच्या विविध समस्यांचा अभ्यास, कौशल्यविकास आणि समाजप्रबोधन हे उद्दिष्ट ठेवून 3 वर्षांचा कार्यकाल निश्चित करण्यात आला. फेब्रुवारी 2009 मध्ये त्यांनी राष्ट्रीय महिला कोषाची पुनर्रचना केली. "एक खिडकी योजना" राबवून महिलांसाठी उपयोगी धोरणे आणि शिफारशी सुचविल्या. या योजनांमधून शेकडो महिलांना आधार मिळाला.[6] त्यांनी जात, धर्म, भाषा या मर्यादा ओलांडून केवळ सामाजिक बांधिलकीवर भर दिला. ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि दारिद्र्य लक्षात घेऊन त्यांनी रोजगारनिर्मितीवर भर दिला. वनीकरण, पाणलोट विकास, वृक्ष लागवड, डोंगर विकास, आणि आरोग्य

सुविधा यांसारख्या योजनांमधून हजारो कुटुंबांना मदतीचा हात दिला. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेद्वारे महिलांना व पुरुषांना समान मजुरी मिळावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

प्रतिभाताई पाटील यांचे सामाजिक, प्रशासकीय, आणि महिला चळवळीतले योगदान अनमोल आहे. त्यांनी महिलांच्या जीवनातील वेदनांना वाचा फोडली, गरिबांना, अनाथांना, अपंगांना मदत केली. त्यांच्या मते, लोकशाही निर्णय प्रक्रियेत महिलांचे प्रतिनिधित्व आवश्यक असून, ते नसल्यास महिलांसाठी प्रभावी धोरणे राबविणे कठीण होते. त्यांच्या विचारानुसार, स्त्रीचा सामाजिक दर्जा ही सामाजिक रचना, मूल्यव्यवस्था, आणि सांस्कृतिक चौकटींवर आधारित असते. विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था, आणि धर्मव्यवस्थेचा स्त्रीच्या जीवनावर मोठा परिणाम होतो.[7] त्यामुळे त्यांनी महिलांच्या स्थितीवर गंभीर भाष्य केले आहे आणि स्त्री जीवनाचे तत्वज्ञान मांडले आहे.

सौ. प्रतिभा देवीसिंह भारताच्या 12व्या राष्ट्रपती होत्या आणि त्यावेळी भारताच्या इतिहासातील पहिली महिला राष्ट्रपती म्हणून 2007 ते 2012 या काळात त्यांनी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या सुरुवातीचे पाऊल समाजसेवेतून पडले आणि गांधीवादी विचारांनी भारावलेल्या त्या राजकारणात सक्रिय झाल्या. राष्ट्रपती होण्यापूर्वी त्या राजस्थानच्या 16व्या राज्यपाल होत्या, तसेच त्या त्या राज्याचे पहिले महिला राज्यपाल म्हणून इतिहासाला मौजुद ठेवत होत्या. तत्पूर्वी त्या राज्यसभेच्या उपसभापती आणि 1962 ते 1985 या कालावधीत महाराष्ट्र विधानसभेच्या आमदार होत्या, ज्यावेळी त्यांना विविध खात्यांचे मंत्रीपदही लाभले.[8]

राजकारणात त्यांचा प्रवास मुक्ताईनगर आमदार म्हणून 1967 पासून सुरू झाला; त्यानंतर त्या लोकसभेतूनही खासदार म्हणून निवडल्या गेल्या. 1974ते 1980 यावेळी त्या विरोधी पक्षनेत्येसारख्या जबाबदाऱ्या निभावत होत्या. त्यानंतर 1985 मध्ये ते राज्यसभेचे सदस्य बनल्या, 1988 ते 1990 यांच्या दरम्यान राज्यसभेच्या उपसभापतीपदावर होत्या आणि 1991 मध्ये त्यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून पाय रोवले.[9] नोव्हेंबर 2004 मध्ये त्या राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्त झाल्या.

राष्ट्रपतीपद स्वीकारल्यानंतर त्या भारतीय अिरीहदलाच्या पहिल्या महिला सेनापती बनल्या. या काळात त्यांनी देशाच्या विविध प्रांतांत भेट देत सैनिकांचे मनोबल वाढवले; एखाद्यावेळेस त्यांनी सुखोई-30 युद्धविमानातून GF सूट घालण्यासह रोमांचक कामगिरी केली, ज्याने रशियाचे राष्ट्रपती दिमित्री मेदवेदेवकडून त्यांचे कौतुक प्राप्त केले. राजकारणाबरोबर त्यांनी महिला सबलीकरणावरही विशेष लक्ष दिले. त्यांनी 'National Mission for Empowerment of Women' ही बालविकास खात्याशी जोडली आणि तिचे उद्दिष्टही स्पष्ट केले.[10] स्त्री-पुरुष समान हक्क, योजनांचा समन्वय आणि कार्यान्वयन, तसेच समाजातील दुर्बल घटकांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी कार्य केले.

**निष्कर्ष :**

1. जळगाव जिल्ह्यातील त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कामगिरीमुळे अनेक महिलांसाठी राजकारण सर्वसाधारण झाले. आज जळगावमध्ये आमदार, नगरसेविका, सरपंच अशा विविध पदांवर बहुतेक महिलांचे पावलांचे ठसे उमटलेले दिसतात.
2. लिलाताई पाटील व सौ. प्रतिभाताई पाटील यांचा राजकीय प्रवास, त्यांची नैतिकता, संघर्षकाळातील धाडस, आणि समाजविकासासाठी असलेली नि:स्वार्थ भूमिका — सर्व मिळून त्यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री नेतृत्वाला नवीन परिमाण दिले आहे.

3. लिलाताईंनी सत्यशोधक विचारसरणीचा स्वीकार करून पारंपरिक रूढींना धक्का दिला. त्यांनी सामाजिक बंडाचे नेतृत्व केले आणि स्त्री-पुरुष समानतेसाठी क्रांतिकारक निर्णय घेतले. साधा विवाह, सौभाग्यचिन्हांपासून दूर राहणे, अस्पृश्यतेविरुद्ध उघड भूमिका घेणे या कृतींनी त्या समाजपरिवर्तनाच्या अग्रभागी राहिल्या. त्यांचे जीवन सत्यशोधक चळवळीच्या मूळ तत्वांचा प्रत्यक्ष प्रत्यय होते.
4. लिलाताईंनी समाजातील अंधश्रद्धा, जातीय भेद, स्वच्छता, आणि महिला आरोग्यासाठी व्यापक कार्य केले. त्यांनी दवाखाना सुरू करून गरिबांची सेवा केली, स्त्रियांचे सैनिकी प्रशिक्षण घेतले, बचत गट, स्वच्छता मोहीम आणि शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजात जागृती निर्माण केली. त्यांच्या कामातून क्रांतीसाठी वैचारिक नव्हे तर कृतीशील परिवर्तन आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.
5. लिलाताईंनी राजकारण सत्तेसाठी नव्हे, तर सामाजिक न्यायासाठी वापरले. त्यांनी निवडणुका, मोर्चे, उपोषण, पंचायत राज माध्यमातून स्त्रियांचे नेतृत्व निर्माण केले. स्वतः पद न मागता इतर महिलांना पुढे आणले. डॉ. आंबेडकर, फुले, गांधी यांचे विचार अंगीकारून त्यांनी "राजकारण म्हणजे समाजकारण" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली, जे आजच्या राजकीय व्यवस्थेसाठी आदर्श आहे.
6. लिलाताईंचे कार्य वंचित, मजूर, आणि महिलांच्या हक्कांसाठी समर्पित होते. त्यांनी महिलांच्या मजुरीतील भेदाभेद दूर करण्यासाठी आंदोलन चालवले. सामाजिक समावेश, धर्म-जात विसरून एकात्मतेवर भर देऊन त्यांनी एक नवा विचार समाजात रुजवला. त्यांचे कार्य समाजातील दुर्बल घटकांसाठी आशेचा किरण ठरले.
7. प्रतिभाताईंनी शिक्षण, कायदा, समाजकार्य आणि राजकारण यांमध्ये यशस्वी वाटचाल केली. महाराष्ट्रात आमदार ते भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपतीपर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायक होता. त्यांनी महिलांसाठी अनेक योजना राबवल्या, राज्यपाल व राष्ट्रपतीपद भूषवताना राष्ट्रीय नेतृत्वाचे उत्तम उदाहरण ठरल्या. त्यांनी महिला सबलीकरणाचे नवे दालन उघडले.
8. प्रतिभाताईंनी National Mission for Empowerment of Women सारख्या योजनांतून महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी महिला धोरणांच्या अंमलबजावणीसाठी 'एक खिडकी योजना' सुरू केली. ग्रामीण महिला, अल्पसंख्याक महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी त्यांनी समर्पित प्रयत्न केले.
9. त्यांनी महिलांचे स्थान हे केवळ सांस्कृतिक नव्हे तर संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहिले. विवाहसंस्था, धर्म आणि कुटुंबव्यवस्थेचा स्त्रीवर होणारा परिणाम त्यांनी अधोरेखित केला. स्त्रीच्या सामाजिक स्वातंत्र्यासाठी त्यांनी राजकीय, प्रशासकीय धोरणांमध्ये सक्रिय हस्तक्षेप केला. त्यांनी महिलांच्या वेदनांना सार्वजनिक मंच दिला.
10. राष्ट्रपतीपदावर कार्यरत असताना त्यांनी स्त्री-पुरुष समानतेसाठी विविध निर्णय घेतले. त्यांनी संरक्षण क्षेत्रात महिलांच्या सहभागास प्रोत्साहन दिले, सैनिकांसोबत प्रत्यक्ष संवाद साधला, आणि महिलांसाठी स्वतंत्र योजना आखल्या. त्यांच्या कार्यामुळे महिलांच्या सार्वजनिक जीवनात सामील होण्याच्या संधी मोठ्या प्रमाणावर वाढल्या.

**संदर्भ ग्रंथ :**


1. दास्ताने वा. वि., खादी सेवा संघ, जळगाव, 26 नोव्हेंबर 1931 पृ. क्र. 127
2. मोरे दिनेश, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, (1818-1960) के. एस. प्रकाशन पुणे, 2006 पृ. क्र. 227
3. "आठवणींचे पानं : लिलाताई पाटील यांच्या सहवासातील अनुभव" (स्थानिक दस्तऐवज)
4. पाटील ह.ना., "खानदेशातील सत्यशोधक चळवळ", अर्णव प्रकाशन, पुणे, पृ. क्र. 12
5. starsunfolded.com.pratibhapatildate:07/08/2025
6. internetglobalindia.com/wikipedia.org. date:07/08/2025
7. दीक्षित दिनेश, वेगळ्या वाटा, अथर्व प्रकाशन जळगाव प्रथमावृत्ती, 15 ऑगस्ट 2018 पृ. क्र. 201
8. डॉ. छाया महाजन, प्रतिभाताई पाटील यांचे राजकीय जीवन पृ. क्र. 45
9. डॉ. छाया महाजन, प्रतिभाताई पाटील यांचे राजकीय जीवन पृ. क्र. 65
10. Ramesh chaddha, First Woman President of India Pratibha Patil (English) Kalpana Publications, Pune.